**L. A. BILL No. XIV OF 2023.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSION AND FEES) ACT, 2015.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०१५ चा महा. २८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५, याच्या कलम ११ मधील,-

२०१५ चा महा. २८.

(१) पोट-कलम (३) मध्ये,-

(क) खंड (ग) व (घ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील:-

| | |
|---|---|
| " (ग) दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेचे सदस्य असलेले असे दोन नामांकित सनदी लेखापाल | सदस्य |
| (घ) दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय व्यय आणि परिव्यय लेखा संस्थेचे सदस्य असलेले असे दोन नामांकित परिव्यय लेखापाल किंवा प्रख्यात अर्थतज्ज्ञ | सदस्य;" |

(ख) खंड (च) वगळण्यात येईल;

(ग) खंड (ज) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील:—

| | |
|---|---|
| " (ज-१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण | सदस्य; |
| (ज-२) संचालक, आयुष, महाराष्ट्र राज्य | सदस्य" ; |

(घ) खंड (त्र) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

| | |
|---|---|
| " (त्र) सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल असा राज्य शासनाचा अधिकारी | सदस्य सचिव." ; |

(२) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :-

"(४क) अध्यक्षास, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही विद्यपीठाच्या कुलसचिवास, जेव्हा, त्या विद्यापीठाच्या व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संबंधित शुल्क नियामक प्राधिकरणाचे कामकाज करावयाचे असेल तेव्हा, निमंत्रित सदस्य म्हणून निमंत्रित करता येईल.

(४ख) अध्यक्षास, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, वास्तुशास्त्र, कृषी, आयुर्वेद, औषधवैद्यकशास्त्र, समचिकित्साशास्त्र (होमिओपॅथी), दंतवैद्यकशास्त्र, परिचर्या किंवा औषधनिर्माणशास्त्र शिक्षण क्षेत्रातील कोणत्याही व्यक्तींना किंवा अधिकाऱ्यांना देखील, त्यांचे तज्ञ मत घेण्यासाठी निमंत्रित करता येईल. अशा तज्ञ निमंत्रितांना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकांच्या कामकाजामध्ये सहभागी होता येईल, परंतु त्यांना मतदानाचा हक्क असणार नाही." ;

(३) पोट-कलम (५) मधील, "सदस्य" या मजकुराऐवजी, "सदस्य किंवा तज्ञ" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) याच्या कलम ११ मध्ये विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांद्वारे व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी वाजवी शुल्क संरचना निर्धारित करण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरण घटित करण्याची तरतूद केली आहे. उक्त प्राधिकरणामध्ये अध्यक्ष, जो उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा शासनाचा मुख्य सचिव दर्जाचा सेवानिवृत्त अधिकारी आहे आणि ख्यातनाम शिक्षण तज्ञ, एक सनदी लेखापाल, एक परिव्यय लेखापाल, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील नामांकित तज्ञ व इतर शासकीय सदस्य यांचा समावेश आहे.

२. उक्त प्राधिकरणास, प्रस्तावावर निर्णय घेतांना आणि वाजवी शुल्क अंतीम करताना लगतपूर्वीच्या वर्षादरम्यान संस्थेचे उत्पन्न व केलेला खर्च, चालू शैक्षणिक वर्षाचा अंदाजित अर्थसंकल्प, मंजूर प्रवेश क्षमता इत्यादी बाबी प्रामुख्याने विचारात घ्याव्या लागतात.

प्राधिकरण, प्रत्येक प्रस्तावांची छाननी करण्यासाठी आणि उत्पन्न व खर्च याविषयीच्या प्रत्येक संस्थेने केलेल्या वास्तविक विवरणाची अचूकता निर्धारित करण्यासाठी सनदी लेखापालाचे व परिव्यय लेखापालाचे सहाय्य प्रामुख्याने घेणे आवश्यक असते. त्यामुळे उक्त प्राधिकरणावर एक अतिरिक्त सनदी लेखापाल व एक परिव्यय लेखापाल यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. शासनाला, याबरोबरच प्राधिकरणाचे सदस्य म्हणून आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांची नियुक्ती करणे आवश्यक वाटते.

अध्यक्षास, प्राधिकरणास सल्ला देण्यासाठी महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठाच्या कुलसचिवास व उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, इत्यादींसारख्या व्यावसायिक शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमधील तज्ञांना निमंत्रित करण्याची तरतूद प्रस्तावित केली आहे.

४. वरील प्रयोजनांसाठी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ याच्या कलम ११ मध्ये यथोचित सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २० मार्च, २०२३.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

**सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट**

**( महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यातील उतारे )**

**( सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ )**

**१. ते १०.** * * *

शुल्क नियामक प्राधिकरण.

**११.** (१) आणि (२) * * *

(३) प्राधिकरण हे पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल, -

(क) आणि (ख) * * *

(ग) दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेचा सदस्य असेल असा नामांकित सनदी लेखापाल . . सदस्य

(घ) दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय व्यय आणि परिव्यय लेखा संस्थेचा सदस्य असलेला असा नामांकित परिव्यय लेखापाल किंवा प्रख्यात अर्थतज्ज्ञ . . सदस्य

(ङ) * * * *

(च) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक . . सदस्य

(छ) ते (झ) * * *

(त्र) सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा राज्य शासनाचा अधिकारी . . सचिव

(४) * * *

(५) कोणत्याही खाजगी अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्थेशी सहयोगी असलेली कोणतीही व्यक्ती, शुल्क नियामक प्राधिकरणाची सदस्य होण्यास पात्र असणार नाही.

(६) ते (८) * * *

**१२. ते २६.** * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.]**

**[ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई